प्रभागरचनेबाबत उत्सुकता कायम

पिंपरी-चिंचवडमध्ये ३२ प्रभाग, १२८ नगरसेवक राहण्याची शक्यता?

लोकसत्ता प्रतिनिधी

पिंपरी : गेल्या तीन वर्षांपासून रखडलेला महापालिकेची निवडणूक घेण्याचा मार्ग मोकळा झाला असून, पिंपरी-चिंचवडमध्ये प्रभागरचना 'जैसे थे' राहणार आहे. २०१७ प्रमाणे चार सदस्यीय पद्धतीने निवडणूक होणार असून, ३२ प्रभाग आणि नगरसेवकांची संख्या पूर्वीप्रमाणेच १२८ राहण्याची शक्यता आहे.

महापालिकेतील लोकनियुक्त प्रतिनिधींची मुदत १३ मार्च २०२२ रोजी संपली. मात्र, करोना प्रतिबंधक नियम, राज्यातील बदलत्या राजकीय घडामोडी, ओबीसी आरक्षणाचा न्यायप्रविष्ट मुद्दा, अशा विविध कारणांमुळे महापालिका निवडणूक तीन वर्षांपासून लांबणीवर पडली आहे. २०१७ च्या निवडणुकीत १७ लाख लोकसंख्येला महापालिकेत १२८ नगरसेवक आणि ३२ प्रभाग होते. २०११ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या १७ लाख २९ हजार ३५९ आहे. सध्याची लोकसंख्या ३० लाखांवर गेली असल्याचा प्रशासनाचा अंदाज आहे.

शहरात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) प्रतिस्पर्धी आहेत. २०१७ मध्ये भाजपने राष्ट्रवादीकडून महापालिकेतील सत्ता खेचून घेतली. आता अजित पवार हे भाजपबरोबर आहेत. त्यामुळे दोन्ही पक्ष महापालिका ताब्यात घेण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडी एकत्रित लढणार, की स्वबळावर याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही केली जाईल. अद्याप कोणत्याची सूचना देण्यात आलेल्या नाहीत.
- अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, निवडणूक विभाग, पिपरी-चिंचवड महापालिका

भाजपाच्या माध्यमातून अतिशय चांगल्या प्रकारचा नियोजनबद्धरीत्या विकास झाला. शहरातील नागरिकांना आणि भूमिपुत्रांना न्याय देत शहर विकासाची भूमिका ठेवली आहे. ती आगामी काळातही तशीच राहील. संघटनात्मक पातळीवर तिन्ही विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजपाने प्रभावीपणे काम केले आहे. त्यामुळे महापालिकेत पुन्हा एकदा कमळ फुलेल यात शंका नाही.
- महेश लांडगे, आमदार

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची निवडणूक लढण्याची तयारी झाली आहे. महाविकास आघाडी किंवा पक्ष आदेशाप्रमाणे स्वतंत्र निवडणुका लढून महापालिका जिंकण्यासाठी कार्यकर्ते सज्ज आहेत.
- तुषार कामठे, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)

निवडणूक होणार असल्याने नगरसेवकांच्या रूपात नागरिक आणि प्रशासन यांच्यात दुवा निर्माण होऊन समस्या सुटण्यास सोयी आहे. कार्यकर्त्यांनाही काम करण्याची संधी मिळेल. महायुतीत की स्वतंत्र लढायचे याचा निर्णय अजित पवार घेतील.
- दीपक मानकर, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

आजपर्यंतची प्रभाग पद्धती

महापालिकेची स्थापना १९८२ मध्ये झाली. मात्र, १९८६ पर्यंत प्रशासकीय राजवट होती.

- १९८६ - पहिली निवडणूक झाली. तेव्हा, एक सदस्यीय प्रभाग पद्धती व ६० प्रभाग
- १९९२ - निवडणुकीत एक सदस्यीय प्रभाग पद्धती व ७८ प्रभाग
- १९९७ - निवडणुकीत एक सदस्यीय प्रभाग पद्धती व ७९ प्रभाग
- २००२ - तीन सदस्यीय प्रभाग पद्धती व ३५ प्रभाग होते, नगरसेवक संख्या १०५
- २००७ - एक सदस्यीय प्रभाग पद्धती व नगरसेवक संख्या १०५
- २०१२ - द्विसदस्यीय प्रभाग पद्धती व ६४ प्रभाग होते, नगरसेवक संख्या १२८
- २०१७ - चार सदस्यीय प्रभाग पद्धती व ३२ प्रभाग होते, नगरसेवक संख्या १२८

२०१७ मधील पक्षीय बलाबल

- भाजप - ७७
- राष्ट्रवादी काँग्रेस - ३६
- शिवसेना - ९
- मनसे - १
- अपक्ष - ५

भाजप निवडणुकीसाठी सज्ज आहे. पुणेकरांनी लोकसभा, विधानसभा निवडणुकीत भाजपला निर्विवाद यश मिळवून दिले. केंद्र व राज्य सरकार पुणे परिसरात मोठ्या प्रमाणात विकासकामे करीत आहे. गेल्या निवडणुकीत भाजपचे शंभर नगरसेवक निवडून आले होते. या वेळी १०५ हून अधिक नगरसेवक निवडून येतील.
- धीरज घाटे, शहराध्यक्ष, भाजप

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे स्वागत आहे. 'प्रशासकराज' राबविले जनमताला डावलण्याचा महायुतीचा प्रयत्न या निर्णयाने उधळून लावला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवाय झाल्यास त्याला सर्वस्वी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री जबाबदार असतील.
- प्रशांत जगताप, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष

महापालिकेत भाजपने केवळ निर्विदांसाठी कामे केली. जनतेचे प्रतिनिधित्व करणारे नगरसेवक नसल्याने लोकहिची कामे रखडली होती. निवडणुका हा लोकशाहीचा मूलभूत पाया आहेत, हे अधोरेखित करणारा निर्णय आहे. निवडणुकीसाठी पक्ष सज्ज आहे.
- गजानन थरकुडे, शहरप्रमुख, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष

पुण्यातील इच्छुकांच्या आशा पल्लवित

महापालिकेची निवडणूक चार महिन्यांत घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिला आहे. त्यामुळे विविधपक्ष लढविण्यासाठी इच्छुक असलेल्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. पुणे महापालिकेची निवडणूक २०१७ च्या नुसार ही प्रभाग रचना लागणार असून, चार सदस्यांचा प्रभाग याप्रमाणे निवडणूक होण्याची शक्यता आहे. पुण्यातील विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांच्या या प्रतिक्रिया...

न्यायालयाच्या निर्णयामुळे पुण्यातील रखडलेल्या विकासकामांना गती मिळेल. नागरिकांना त्यांच्या हक्काचे प्रतिनिधित्व मिळेल. सर्व शिवसैनिक निवडणुकीसाठी सज्ज असून, पुण्याच्या सेवा, विकास आणि गरजांसाठी चांगले काम करण्यास तयार आहेत.
- प्रमोद उर्फ नाना भानगिरे, शहरप्रमुख, शिवसेना

प्रभागरचना करताना सत्ताधाऱ्यांच्या, तत्कालीन व्यवस्थेच्या सोयीनुसार करू नये. विरोधकांनाही विश्वासात घ्यावे. गेली तीन वर्षे लोकप्रतिनिधी नसल्याने पुणेकरांच्या अनेक समस्या प्रलंबित आहेत. निवडणूक झाल्यानंतर पुणेकरांना न्याय मिळेल.
- राजेंद्र उर्फ बाबू वागस्कर, नेते, मनसे

पुणे महापालिकेच्या निवडणुकींसाठी गेल्या सहा महिन्यांपासून तयारी सुरू आहे. विधानसभा व क्लॉक अध्यक्षांची नियुक्ती झाली आहे. प्रत्येक पक्ष स्वबळाची तयारी करीत असून, आघाडी म्हणून निवडणूक लढवायची का, याचा निर्णय प्रदेश पातळीवर होईल.
- अरविंद शिंदे, शहराध्यक्ष, काँग्रेस

न्यायालयाने राज्य सरकारला दिलेली चपराक आहे. स्थानिक नेतृत्वाशिवाय राज्य सरकार सर्व संस्था मागील तीन ते पाच वर्षांपासून चालवत आहे. प्रशासनाला प्रश्न विचारण्यासाठी सभागृहात नगरसेवक नाही आणि त्यामुळे पुणे शहरातील सर्व प्रकल्प कूर्मगतीने सुरू आहेत.
- सुदर्शन जगदाळे, शहराध्यक्ष, आम आदमी पक्ष

तापमानात घट झाल्यामुळे पुणेकरांना दिलासा

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : शहर आणि परिसरातील तापमानात घट झाल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून उन्हाच्या झळा सहन करत असलेल्या पुणेकरांना दिलासा मिळाला आहे. तापमानात झालेली घट आणखी चार ते पाच दिवस कायम राहण्याची, तसेच मेघगर्जनेसह पावसाचीही शक्यता वर्तवण्यात आली आहे.

यंदा एप्रिलच्या महिनाभर तीव्र उष्मा सहन करावा लागला. कमाल आणि किमान तापमानात वाढ होत राहिल्यामुळे उन्हाच्या झळा सहन कराव्या लागल्या. कोरडे हवामान, उत्तरेकडून येणारे उष्ण वारे अशा कारणांमुळे कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक होते. परिणामी, एप्रिलमध्ये १३ ते १४ दिवस कमाल तापमान ४० अंश सेल्सियस किंवा त्यापेक्षा अधिक नोंदवले होते.

हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस. डी. सानप म्हणाले, 'हवेतील आर्द्रता वाढत आहे. त्याशिवाय काही ठिकाणी पाऊस पडल्यामुळे कमाल आणि किमान तापमानात घट झाली आहे. पुढील चार ते पाच दिवस ही स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. तसेच, शहर आणि परिसरात ढगाळ हवामान, मेघगर्जनेसह पावसाचाही अंदाज आहे.'

जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि.

सुहे सौख्यम बिरजते

कॉर्पोरेट ऑफिस / हेड ऑफिस

जीआयसीएचएफएल, नॅशनल इन्शुरन्स बिल्डिंग 6 वा मजला, 14, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई- 400020. दूरध्वनी क्र. 022-43041900.

ईमेल: Investors@Gichf.com, Corporate@Gichf.com वेबसाइट: www.gichfindia.com

- चिंचवड शाखा:- कार्यालय क्र. 202 आणि 203, दूसरा मजला, प्रीमियर प्लाझा II, जी-विंग, जुना पुणे-मुंबई महामार्ग, हसकला साडीच्या दुकानाच्या वर, चिंचवड, पुणे- 411019, मेल आयडी: chinchwad@gichfindia.com
- पुणे शाखा- नीलकंठ, सी.टी.एस. क्र. 1018, एफ.पी.क्र. 370, दिप बंगलो चौक, मॉडेल कॉलनीजवळ, शिवाजी नगर, शांबुर्डा, पुणे- 411016 ईमेल: pune@gichfindia.com

संपर्क तपशील: राजेंद्र गिरी: 9552161428 / अमेय मैराल: 9824833606.

ई-लिलाव विक्री सूचना

ई-लिलाव तारीख: 22-05-2025/बोली सादर करण्याची शेवटची तारीख: 21-05-2025.

ज्या अर्थी, **जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि. (जीआयसीएचएफएल)** चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी, सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 3 वाचत वाचलेल्या कलम 13 (12) अंतर्गत प्रदत्त केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत आणि वित्तिय मत्तेची सुरक्षितता व पुनर्रचना आणि सुरक्षा हित कायदा, 2002 ची अंमलबजावणी अंतर्गत, उक्त कृत्यानंमध्ये नमूद केलेल्या अदत देय रकमेची परतफेड करण्याकरिता खालील ऋणकर्ते / गहाणदार मागणी सूचना निर्गमित केली आहे. तथापी, ऋणकर्ते / गहाणदार उक्त देय रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, तिन्यस्वाक्षरीकारांनी उक्त नियमांच्या नियम 8 सहित वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम 13 (4) अंतर्गत प्रदत्त केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत खालील मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

अ. क्र.	कर्ज फाईल क्र./ शाखेचे नाव/ ऋणको/ सह-ऋणको/ जामीनदार यांचे नाव	मालमत्तेचा पत्ता/ मालमत्तेचा क्षेत्रफळ (चौ. फू. मध्ये बिल्ट-अप)	मागणी सूचना प्रकाशनेची तारीख	प्रत्यक्ष ताबा तारीख	05.05.2025 रोजी प्रमाणे एकूण अदत्त रक्कम (पीओएस, व्याज व अन्य आकार समाविष्ट) (रु. मध्ये)	राखीव किंमत (रु. मध्ये)
1	MH02706100004598 [चिंचवड शाखा] / हेमंत जोगी/ यादव पतिराम जोगी	फ्लॅट क्र- 3, सिल्वर मजला, "श्री स्वामी समर्थ नगर", इमारत- 1बी, स. क्र- 172/4 (नवीन), 703/4(जुना), एचपी पेट्रोल पंप, राजुनगर, ता. खेड, जि. पुणे. **बिल्ट अप क्षेत्रफळ: 907 ची फू**	09.10.2023	16.04.2024	2641949/-	2259172/-
2	MH02706100004178 [चिंचवड शाखा] / संजय तिवारी/ पूनम संजय तिवारी	फ्लॅट क्र- 601, सहावा मजला, इमारत- 1, विंग- डी, राग्रा होम्स, गट क्र.- 1009 ते 1011, डी. वाय. पाटील कॉलेज जवळ, नेवाळे वस्ती, चिखली, ता. हवेली, जि. पुणे. **बिल्ट अप क्षेत्रफळ: 630 ची फू**	28.05.2018	12.09.2022	5433718/-	2723125/-
3	MH02706100002769 [चिंचवड शाखा] / सुहास रामचंद्र लोहार / संध्या रामचंद्र लोहार जामीनदार : अतुल नामदेव बांदल / विजय दशरथ भिलारे	फ्लॅट क्र- 06, तिसरा मजला, पोटे इमारत, स. क्र- 20/2, धनकवडी, ता. हवेली, जि.- पुणे. **बिल्ट अप क्षेत्रफळ: 350 ची फू**	28.05.2018	13.11.2019	2521878/-	1291500/-
4	MH02706100003918 [चिंचवड शाखा] / पद्माकर एल नाईक / सविता एल नाईक	फ्लॅट क्र- सी1- 201, दुसरा मजला, इमारत- सी1, मंत्र रेसिडेन्सी, गट क्र.- 1, निघोजे गावठाण जवळ, निघोजे, ता.- खेड, जिल्हा पुणे. **बिल्ट अप क्षेत्रफळ: 574 ची फू**	01.06.2021	02.02.2024	2675403/-	1828190/-
5	MH02706100002438 [चिंचवड शाखा] / अविनाश चंद्रकांत परदेशी/ स्वाती अविनाश परदेशी	फ्लॅट क्र- 4, पहिला मजला, शत्रेश हाइट्स, स क्र- 67/3 + 4 + 5/3/10 (नवीन), (120 - जुना) आणि प्लॉट क्र- 02, काञ्जन, ता. हवेली, जि. पुणे. **बिल्ट अप क्षेत्रफळ: 490 ची फू**	28.05.2018	21.08.2019	4693820/-	1808100/-
6	MH02706100002130[चिंचवड शाखा]/ कै. विल्सन महेंद्र सक्रापान आणि द्वारे त्यांचे कायदेशीर वारस/ कै. महेंद्र शांताराम सक्रापान आणि द्वारे त्यांचे कायदेशीर वारस	फ्लॅट क्र- 803, आठवा मजला, डेस्टिनेशन ओस्टिया, विंग- सी, फेज क्र.- 01, गट क्र- 216, कुडळवाड, ता.- हवेली, जिल्हा- पुणे. **बिल्ट अप क्षेत्रफळ: 568 ची फू.**	09.06.2022	22.02.2024	2862515/-	2300116/-
7	MH02706100004382 [चिंचवड शाखा] / राजेश संवलराम चौधरी	फ्लॅट क्र- 503, पाचवा मजला, स्नेहा विहार, विंग ए- 1, स. क्र- 82, हिस्सा क्र- 10, शिवळे, ता.- हवेली, पुणे. **बिल्ट अप: 939 ची फू.**	01.06.2021	10.10.2022	3647212/-	2129652/-
8	MH03061000001787 [पुणे शाखा] / एकनाथ विश्वनाथ शिरोळे	फ्लॅट क्र- 14, चौथा मजला, विंग- ए, विठ्ठल संगम, स. क्र- 109/19, धायरी, ता.- हवेली, पुणे. **बिल्ट अप: 515 ची फू**	20.08.2021	27.07.2022	1426014/-	1124760/-
9	MH03061000002128 [पुणे शाखा] / देवकी मोहित जानराव / मोहित अरुण जानराव	फ्लॅट क्र- 503, पाचवा मजला, कृष्णा विहार, स. क्र- 32/3, नऱ्हे, ता.- हवेली, जिल्हा- पुणे. **बिल्ट अप क्षेत्रफळ: 585 ची फू**	22.05.2018	05.03.2019	3720103/-	1474200/-
10	MH01301100003195 [पुणे शाखा] / दिनेश उद्धव बागल/ शितल दिनेश बागल	फ्लॅट क्र- जी- 2, तळ मजला, साई प्रेरणा अपार्टमेंट, सर्व्हे क्र.- 165/10/1 (जुना), 204 (नवीन), हिस्सा क्र- 9, राजगड कॉलनी, संतुकडे कॉम्प्लेक्स जवळ, कुसगांव, पुणे- 412308. **बिल्ट अप क्षेत्रफळ: 305 ची फू.**	20.08.2021	15.06.2022	1529278/-	939400/-

ई-लिलावाची तारीख व वेळ: 22-05-2025 रोजी (https://www.bankauctions.in) या वेब पार्टलवर प्रत्येकी 5 मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह दु. 3.00 ते दु. 4.00.

इरठ व केवायसीसह विहित निविदा प्रपत्रात निविदा/मोहरबंद बोलीच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख: ऑनलाईन प्रणालीत किंवा 21.05.2025 रोजी सायं. 05.00 वा किंवा तत्पूर्वी वर नमूद केलेल्या जीआयसीएचएफ कार्यालयात सादर करावयाच्या आहेत.

वा जाहीर सूचनेच्या अधिक सर्वेगी, कायदा 2002 च्या शर्ती व अटी व त्याखालील नियमांअंतर्गत पूर्वीक्त मत्ता / मालमत्तेच्या ई-लिलाव विक्रीकरिता **"जीआयसीएचएफएल" "जसे आहे तेथे आहे" व "जसे आहे जे काही आहे"** या तत्वावर उक्त मालमत्तेच्या खेरदीकरिता प्रस्ताव मोहरबंद लिफाफा मध्ये किंवा ऑनलाईन प्रणालीत मागवीत आहेत.

लिलाव विक्रीच्या अटी आणि नियम खालीलप्रमाणे आहेत:-

1. ई-लिलाव **"जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे", "तेथे जे काही आहे"** आणि **"इतर कोणताही उपाय नाही"** तत्वावर आयोजित केले जात आहेत आणि "ऑनलाइन" आयोजित केले जातील. ई-लिलाव जीआयसीएचएफ मान्यताप्राप्त लिलाव सेवा प्रदाता "मे. 4 क्लोजर" द्वारे आयोजित केला जाईल.
2. **इच्छुक बोलीदारांनी https://bankauctions.in/ या पोर्टलवर त्यांची नावे नोंदवावीत आणि त्यांचा युजर- आयडी आणि पासवर्ड मोफत मिळवावा. संभाव्य बोलीदार सेवा प्रदाता मे. 4 क्लोजर # 605 ए, सहावा मजला मैत्रीवनम, अमीरपेट, हैदराबाद- 500038, तेलंगणा, कडून ई-लिलावाचे ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात. ऑफिस लैंड लाइन नंबर: -040-23736405; बँकांड्रेस दीम: 8142000062 / 66, श्री. प्रकाश- 8142000064 / 8142000725, prakash@bankauctions.in, श्री. नितेश पवार, व्यवस्थापक, मुंबई, क्र.: 8142000725, मेल आयडी: Nitesh@bankauctions.in, मालमत्तेची चौकशी, संपर्क तपशील: राजेंद्र गिरी: 9552161428 / अमेय मैराल: 9824833606 / प्राजक्ता मिठपोहे: 9766659328 / सुशील रेड्डे: 76666155017.**
3. ई-लिलाव विक्री सरफेसी कायदा / नियम 2002 आणि येथे खाली नमूद केलेल्या अर्ज व शर्तीच्या / वेबसाइट देखील तसेच इच्छुक / सक्षमपणे बोलीदारांनी सादर करावयाच्या ऑफर / बोली दस्तऐवजातील अटींच्या अधीन आहे.
4. ऑनलाइन ई-लिलावात सहभागी होण्यासाठी प्रत्येक बोलीदारकडे स्वतःचा ईमेल पत्ता असणे आवश्यक आहे.
5. एकदा इच्छुक बोलीदाराने जीआयसीएचएफ च्या प्राधिकृत अधिकारासमोर पात्र निविदाकार म्हणून औपचारिकपणे नोंदणी केल्यानंतर, वाढीव सहभागी होण्यासाठी त्याची / तिची इच्छा ई-लिलाव बिडिंग प्लॅटफॉर्म, दस्तऐवज सबमिट करून व्यक्त करायी लागेल. ई-लिलाव सेवा प्रदात्याकडून त्याचा / तिचा लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवावे ही निविदाकारची / ऑनलाईन बोलीदाराची एकमात्र जबाबदारी असेल.
6. उपरोक्त मालमत्ता वर नमूद केलेल्या राखीव किमतीपेक्षा कमी विकल्या जाणार नाहीत.
7. इच्छुक बोलीदारांनी वर सांगितलेल्या संबंधित राखीव किमतीच्या 10% बयाणा ठेवा / इरठ ड्रॉफ्ट / एनईएफटी द्वारे **जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि. यांच्या नावे जमा करणे आवश्यक आहे. बँक तपशील खालीलप्रमाणे आहेत. बँकेचे नाव: युनियन बँक ऑफ इंडिया, खाते क्र.: 005111010000039 - खाते नाव: जीआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड लिलाव खाते, शाखेचे नाव: एलमीची, फोर्ट पत्ता: यूबीआय, 239, बँकेचे सिलेंगेटिआ नरिमन पॉइंट मुंबई महाराष्ट्र पिनकोड 400021. आयएफएससी कोड- UBIN0800511.**
8. वशस्वी बोलीदारांच्या बाबतीत सांगितलेल्या रेवी / रेवीचे समायोजन केले जाईल, अन्यथा परत केले जाईल. सांगितलेल्या बयाणा ठेवींवर कोणतेही व्याज असणार नाही.
9. तारीख बयाणा ठेवा (ईएमडी) सोबत ऑफर ईएमडी सह **https://bankauctions.in/** पोर्टलद्वारे "ऑनलाइन" सादर केले जाऊ शकतात. आणि पॅन कार्ड आणि पत्त्याच्या पुराव्यासह केवायसी कागदपत्रांची स्कॅन केलेली प्रत, सेवा प्रदात्याला किंवा विड फॉर्म, ईएमडीसह सीलबंद कव्हर आणि केवायची दस्तऐवज वर नमूद केलेल्या ईएमडी सबमिशन देय तारखेला किंवा त्यापूर्वी सादर करून ते जीआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या संबंधित शाखा कार्यालयात पोहोचावेत.
10. म्हणजे, निविदा जाहिरातीनंतर, जर इच्छुक बोलीदारांनी राखीव किमतीपेक्षा कमी नसलेल्या बोली सादर केल्या आहेत, तरांच सर्वाधिक बोली सादर करणाऱ्या प्राधिकृत अधिकाऱ्याच्या विवेक बुद्धीने एकमेव संधी दिली जाईल.
11. यशस्वी बोलीदारांनी विक्रीच्या संदर्भात प्राधिकृत अधिकारी द्वारे ऑफर स्वीकृत स्थानांतर तावडतोब विक्री किमतीच्या 25% रक्कम जमा करायी, आधीच भरलेल्या ईएमडीचे समायोजन करावे, असे न केल्यास जमा केलेली बयाणा जप्त केली जाईल. विक्री किमतीची उर्वरित 75% रक्कम प्राधिकृत अधिकारीच्या विवेकबुद्धीनुसार विक्रीची पुष्टी करण्याच्या तारखेच्या 15 दिवसांच्या आत देय आहे. विहित कालावधीत शिल्लक रक्कम जमा करण्यात अयशस्वी झाल्यास, जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल. प्राधिकृत अधिकाराने यशस्वी बोली लावणाऱ्याला जनीची कोणतीही सूचना देण्याची आवश्यकता नाही.
12. बोलीदार "चेतनवती पेणणा" (सायन स्टेशेदार) या तत्वाने बांधील असेल आणि लागू कर्म किंवा इरहित मालमत्तेची कोणतीही देयता, मालमत्ता करायी थकबाकी, आयकर, उत्पादन शुल्क, वन मयार देय, वीज आणि देखभाल देय इत्यादी आणि वैधानिकता शोधण्यासाठी स्वतःचे गोग परिश्रम घेण्याचा मक्षा दिला जाती. यशस्वी बोलीदारांना सर्व खर्च जसे की, नगरपालिका कर, देखभाल / सोसायटी शुल्क, वीज शुल्क, पाणी शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, (लागू असल्यास), काही असल्यास आणि इतर सर्व आनुषंगिक शुल्क, विक्री किमती व्यतिरिक्त संबंधित मालमत्तेशी संबंधित सर्व खर्च सर स्वतः सहन करावे लागतील.
13. यशस्वी बोलीदारने सुरक्षित मालमत्ता त्यांच्या / रिच्या नावावर हस्तांतरित करायी कांता विक्री प्रमाणपत्रांच देय असलेले शुल्क / मोबदला, जसे की नोंदणी फी, मुद्रांक शुल्क, कर किंवा देय इतर कोणतीही कर्तव्ये सहन करावीत.
14. विक्री प्रमाणपत्र यशस्वी बोलीदाराच्या नावाने आणि संपूर्ण / विक्री किंमत मिळाल्यानंतरच जारी केले जाईल.
15. गहाणे कर्जदार / गहाणदार / आणि जामीनदार यांना सूचना देण्यात येत आहे की ते ई- लिलाव विक्री च्या अटी आणि नियमांसुसार वर नमूद केलेली मालमत्ता खरेदी करण्यासाठी इच्छुक खरेदीदार / खरेदीदार आणू शकतात.
16. वरील मालमत्तेची तपासणी विनंतीनुसार आणि प्राधिकृत अधिकाराच्या सोयीनुसार केली जाऊ शकते.
17. प्राधिकृत अधिकारी सर्वोच्च ऑफर किंवा कोणतीही एक किंवा सर्व ऑफर स्वीकारण्यास बांधील नाही आणि त्याचे कोणतेही कारण न देता कोणतीही एक किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवते.
18. वर नमूद केल्याप्रमाणे जीआयसीएचएफएल मालमत्तांवर प्रलंबित असलेल्या कोणत्याही दायित्वासाठी जबाबदार नाही. मालमत्तेचा लिलाव **"जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे", "तेथे जे काही आहे"** आणि **"इतर को णताही उपाय नाही"** तत्वावर केला जाईल.
19. कर्जदार / गहाणदारने विक्रीची पुष्टी करण्यापूर्वी, कराराचीत देय + खर्च + विक्रीच्या घोषणेच्या तारखेपासून 15% व्याज + खरेदीच्या रकमेच्या 5% (विक्रीनंतर यशस्वी बोली लावणाऱ्याला रक्कम शायी लारेल) आणि विक्री रद्द करण्याच्या विनंत्या यांकरिता जीआयसीएचएफएल यांनेशी संपर्क साधल्यास, जीआयसीएचएफएल रक्कम स्वीकारेल आणि तावा रतणदारास देण्यात येईल.
20. सर्वाधिक बोली लावणाऱ्याला ललेचच विक्री सूचनेनुसार बोलीच्या रकमेच्या 25% (जमा केलेला बयाणा रकमेसह) भरावे लागेल आणि उर्वरित बोली रकमेच्या 75% रक्कम 15 दिवसांत किंवा पक्षांमध्ये (एओ आणि यशस्वी बोलीदार) यांच्यात सहमती ठरविलेल्यानुसार अशा इतर विस्तारित कालावधीत देय करपात यावे. तथापि, प्राधिकृत कार्यालयाने विक्रीच्या तारखेपासून 30 दिवसांची मुदत संरचनातंर विक्री प्रमाणपत्राची पुष्टी केली पाहिजे आणि कोणत्याही परिस्थितीत विक्रीच्या तारखेपासून 30 दिवस संपण्यापूर्वी विक्रीची पुष्टी केली जाणार नाही. संपूर्ण पेमेंट मिळाल्यानंतरच, विक्रीची पुष्टी केली जाईल आणि विक्री प्रमाणपत्र जारी केले जाईल.
21. किमान बोली वाढीचे मूल्य रु. 10,000/- आहे.

सरफेसी कायदा, 2002 अंतर्गत वैधानिक 15 दिवसांची विक्री सूचना

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्ती आणि मालमत्तेच्या संपूर्ण वर्णनासाठी कृपया मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा प्रदाते मे.क्लोजर यांची वेबसाइट आणि https://bankauctions.in वेबसाइट पहा.

जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि. करिता
स्वा./-
प्राधिकृत अधिकारी

तारीख: 07.05.2025
स्थळ: चिंचवड/हडपसर/हिंजवडी/पुणे

पिंपरी महापालिकेचे निगडीत 'डेटा सेंटर'

पाच वर्षांची माहिती जतन करण्याची क्षमता

लोकसत्ता प्रतिनिधी

पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेचे दैनंदिन कामकाज एक एप्रिलपासून ई-ऑफिसच्या माध्यमातून डिजिटल झाले आहे. त्यामुळे कामकाज कागदविरहित झाले आहे. विविध विभागांची माहिती संगणकावर अपलोड होते. ही सर्व माहिती निगडीतील कमांड अँड कंट्रोल सेंटरमध्ये संग्रहित करून ठेवण्यात येत आहे. त्यात पाच वर्षांचा विदा साठवण्याची व्यवस्था आहे. त्यात आवश्यकतेनुसार वाढ करण्यात येणार आहे.

महापालिकेचे विविध ५२ विभाग आहेत. त्याचे दैनंदिन कामकाज ई-ऑफिस या नवीन संगणक प्रणालीद्वारे सुरू करण्यात आले आहे. दरसोज केलेले कामकाज, अभिलेख विभागातील महत्त्वाची कागदपत्रे, नस्तीचे डिजिटायजेशन करण्यात येत आहे. कामकाजासाठी कागदाचा वापर बंद करण्यात आला आहे. संगणकावरील सर्व माहिती महापालिकेच्या सर्व विभागांची माहिती कमांड अँड कंट्रोल सेंटरमध्ये संग्रहित (स्टोअर) करून ठेवण्यात येत आहे. त्यात महापालिकेच्या सर्व विभागांची पाच वर्षांची माहिती सुरक्षितपणे जतन करता येणार आहे.

दैनंदिन कामकाजासह महापालिकेचे महत्त्वाचे दस्तावेज, करारनामे, महत्त्वाची कागदपत्रे, गोपनीय माहिती, नकाशे, शहराचे विविध आराखडे, प्रकल्पांची माहिती, मालमत्ता, शहरातील नागरिकांची माहिती संग्रहित करण्यात आली आहे. ही माहिती सुरक्षित राहावी यासाठी केंद्र सरकारचे सायबर सुरक्षेचे प्रमाणपत्र महापालिकेने घेतले आहे. त्यामुळे डाटा सेंटर पूर्णपणे सुरक्षित असल्याचा दावा महापालिकेने केला आहे.

महापालिकेच्या सर्व विभागांची माहिती कमांड अँड कंट्रोल सेंटरमध्ये संग्रहित करून ठेवण्यात येत आहे. यात ५२ विभागांचा पाच वर्षांचा विदा ठेवण्याची क्षमता आहे. सायबर हल्ला होऊ नये यासाठी केंद्र सरकारचे सायबर सुरक्षेचे प्रमाणपत्र घेण्यात आले आहे.
- नीळकंठ पोमण, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका

हिंजवडीतील 'डेटा सेंटर'चा वापर बंद

महापालिकेचे 'डेटा सेंटर' नव्हते. त्यामुळे महापालिकेची सर्व कागदपत्रे, नस्त्या, महत्त्वाची माहिती हिंजवडीतील एका खासगी कंपनीच्या 'डेटा सेंटर'मध्ये ठेवण्यात आली आहे. तेथून तो विदा काढून निगडीतील केंद्रामध्ये ठेवला जाणार आहे. ही प्रक्रिया टप्प्याटप्प्याने सुरू आहे. त्यानंतर हिंजवडीतील डेटा सेंटरचा वापर करणे बंद केला जाणार आहे.

विमलबाई सपकाळे यांचे निधन



पुणे : विमलबाई रघुनाथ सपकाळे (वय ७८) यांचे मंगळवारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर धुळे येथे बुधवारी (७ मे) अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या मागे चार मुली, दोन मुले, सुना, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. 'लोकसत्ता'चे मुद्रितशोधक संजय सपकाळे यांच्या त्या मातोश्री होत.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) विभागीय कार्यालय, नागपूर

प्रशासकीय इमारत क्र. २, बी विंग ७ वा माळा सिव्हिल लाईन्स, नागपूर- ४४० ००१.

संकेतस्थळ- www.mahaurja.com ई-मेल- domedanagpur@mahaurja.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६४२५६

ई-निविदा सूचना

ई-निविदा क्र. REN/CH/451KW/11SITE/25-26/291 ID-2025_MEDA_1173949_1

नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली व महाऊर्जा, पुणे मार्फत नोंदणीकृत व अधिकृत वेन्डरद्वारे प्रमाणित केलेल्या सौर उत्पादकाकडून चंद्रपूर जिल्हा अंतर्गत विविध ११ ठिकाणी एकूण ४५१ कि.वॅ. क्षमतेचे पारेषण संलग्न सौर विद्युत संच, १० नग सौर एल.ई.डी. हायमास्ट व ४५ नग सौर पथदिवे व वर्षाच्या हंगी कालांवधी, देखभाल व दुरुस्तीसह आस्थापित करण्याकरिता निविदा मागविण्यात येत आहे. निविदा संबंधीची संविस्तर माहिती **http://mahat